# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 18.10.2024** **वार – गुरुवार**

---

**आढावा बैठक**

विधानसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर पुणे जिल्ह्याच्या सीमेवरील अहिल्यानगर, सोलापूर, ठाणे, सातारा आणि रायगड या जिल्ह्यातील जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क अधिकारी, उप जिल्हा निवडणूक अधिकारी, निवडणूक निर्णय अधिकारी यांची आंतरजिल्हा सीमा आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. ही बैठक दूरदृश्य प्रणाली द्वारे घेण्यात आली. आपापल्या तपासणी नाक्यांवर आचारसंहितेच्या कालावधीत संशयीत वाहतुकीवर कडक नजर ठेवून कारवाई करावी, अशा सूचना जिल्हाधिकारी आणि जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी यावेळी केल्या.

**मतदारयादी**

विधानसभा निवडणुकीसाठी 20 नोव्हेंबर ला राज्यात मतदान होणार आहे. या निवडणुकीत मतदानाचा हक्क बजावता यावा, यासाठी मतदार यादीमध्ये नांव असणं आवश्यक असल्यानं, वयाची 18 वर्षे पूर्ण झालेल्या नवमतदारांनी आपलं नाव प्राधान्यानं मतदार यादीत समाविष्ट करावं असं आवाहन जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ.सुहास दिवसे यांनी केलं आहे. उद्या अर्थात 19 ऑक्टोबर पर्यंत आपलं नाव मतदार यादीत नोंदवू शकतो.

**बावनकुळे**

भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज पुण्यात विधानसभा निवडणुकीसाठी इच्छुक असलेल्या उमेदवारांची भेट घेतली. निवडणुकीसाठी इच्छुकांचा विचार पक्षानं ऐकून घेतला असून त्यांचं म्हणणं पक्ष श्रेष्ठींपुढे मांडण्यात येईल; पण पक्षाकडून ज्याला उमेदवारी मिळेल त्याचं काम करावं लागेल असं त्यांनी यावेळी सांगितलं.

**राजीनामा**

पुणे शहरातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या कोणत्याही पदाधिकाऱ्यांचा राजीनामा स्वीकारणार नसल्याचं पक्षाचे अध्यक्ष अजित पवार यांनी आज स्पष्ट केलं. राज्यपाल नियुक्त आमदारांच्या यादीत समावेश न झाल्यानं पुणे शहराध्यक्ष दीपक मानकर यांनी पदाचा राजीनामा देण्याचा इशारा दिला होता तर शहरातील 600 पेक्षा जास्त पदाधिकाऱ्यांनी आपल्या पदाचा राजीनामा सादर केला होता. नाराजीची दखल घेतली असून योग्य वेळी न्याय दिला जाईल अशा शब्दात पवार यांनी आज पदाधिकाऱ्यांची समजूत घातली.

**युथ आयकॉन**

युवा पिढीला वाव मिळण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी यांच्या वतीनं युथ आयकॉन 2024 स्पर्धेचं आयोजन करण्यात आलं होतं. यावेळी आयुक्त शेखर सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली शंभर टक्के मतदान करण्याचा निर्धार करण्यात आला.

**खरेदी केंद्र**

मंचर कृषी उत्पन्न् बाजार समितीनं सोयाबीन, धान्य, कडधान्य, तेलबिया खरेदी केंद्र सुरू करावं, अशी मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेनं उपसभापती सचिन पानसरे यांच्याकडे केली आहे. व्यापारी शेतावर जाऊन सोयाबीन कमी दराने खरेदी करत आहे. यामध्ये शेतक-यांची लूट होत असून यामुळे खरेदी केंद्र सुरू करण्याची मागणी करण्यात आली आहे.

**माध्यम कार्यशाळा**

आजच्या विज्ञान तंत्रज्ञानातून अनेक गोष्टींचं मंथन होतं आणि त्यातून जे हलाहल निर्माण होतं ते पचवण्यासाठी ज्ञानाची उपासना आवश्यक ठरते असं मत डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या नियामक परिषदेचे अध्यक्ष प्रमोद रावत यांनी व्यक्त केलं. ते आज पुण्यात संस्थेच्या शिक्षकांसाठी आयोजित दोन दिवसीय माध्यम कार्यशाळेत बोलत होते. आज पहिल्या दिवशी माध्यम तज्ञ संजय मयेकर, अमोल पवार आणि मिलिंद कांबळे यांनी मार्गदर्शन केलं.

**वाहतूक**

वाहतुकीच्या नियमांचं उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकांवर पुणे पोलिसांनी कारवाई सुरू केली आहे. गेल्या 15 दिवसात 25 हजार चालकांवर कारवाई करण्यात आली असून दोनशे हून अधिक वाहन जप्त करण्यात आली आहेत. तर उलट्या दिशेनं येणारी वाहनं सहा महिन्यांसाठी जप्त करण्यात येणार असल्याचा इशारा पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिला आहे.

**गाडगीळ निधन**

गाडगीळ यांचं टिळक महाराष्ट्र विद्यापीठातून संस्कृत विषयात पदवीपर्यंतचं अध्ययन, शारदा ज्ञानपीठाची स्थापना, संस्कृत भाषेच्या प्रचारासाठी आणि प्रसारासाठी केलेला प्रयास आणि त्यासाठी अमेरिका, आफ्रिकेमध्ये अनेक वेळा त्यांनी प्रवास केला होता. ते संस्कृत भाषेविषयी नेहमी आग्रही असून भाषण सुद्धा संस्कृतमध्येच करत असत. त्यांचा प्रचिन ग्रंथ, वेद, उपनिषदे यांचा गाढा अभ्यास होता.

**क्रिकेट**

पुणे जिल्हा क्रिकेट संघटनेच्या मान्यतेनं मान्सुन करंडक 19 वर्षाखालील आंतरक्लब टी-20 क्रिकेट स्पर्धा सुरू आहेत. स्पर्धेत आदित्य गोरगे यानं केलेल्या अष्टपैलु खेळीमुळे एलिट ईगल्स्ने आर्यन्स् क्रिकेट ॲकॅडमीचा 17 धावांनी पराभव करून अंतिम फेरी गाठली. अन्य दुसऱ्या सामन्यात हर्ष टिंगरे यानं केलेल्या भेदक गोलंदाजीच्या जोरावर सेन्चुरी क्रिकेट ॲकॅडमीने सनराईज क्रिकेट स्कूलचा 9 गडी राखून पराभव केला आणि अंतिम फेरीत प्रवेश केला.

**हवामान**

पुणे आणि परिसरात उद्या तुरळक ठिकाणी मेघ गर्जनेसह पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर संध्याकाळी 6 वाजता ताज्या पुणे वृत्तांतसह. नमस्कार.**